# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- २९/१२/२०१८

## थर्टी फस्टला पहाटेपर्यंत पोलीस बंदोबस्त - ग्रामीण पोलीस दल सज्ज

---

सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करातांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये यासाठी ग्रामीण पोलीस दलाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे जिल्हयातील ४० पोलीस ठाणे निहाय चोख बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हयातील महामार्ग, वर्दळीचे ठिकाणे, चेक पोस्ट इ. ठिकाणांवर बॅरिकेटस् लावुन सतर्क नाकाबंदी करण्यात येणार आहे. ड्रंक अॅन्ड ड्राईव्हवर लगाम लावण्यासाठी ब्रिथ अॅनालायझर मशिन सज्ज ठेवण्यात आले असुन हॉटेल्स, ढाबे, रिसॉर्ट या ठिकाणांवर फिक्स पॉईंट लावुन वाहतुक कोंडी आणि सुरक्षात्मक योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे. याशिवाय महामार्ग व रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने सतर्क पेट्रोलिंग ठेवण्यात येणार आहे. तसेच महिला व मुलींची छेडछाड रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस व दामिनी पथकास तैनात करण्यात येणार आहे. नाशिक ग्रामीण जिल्हयातील मालेगाव विभागासाठी बंदोबस्त प्रभारी म्हणुन अपर पोलीस अधीक्षक **श्री. नीलोत्पल सो.** यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयात सतर्क बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

बंदोबस्त दरम्यान जिल्हयातील विविध पर्यटन स्थळे, रिसॉर्ट, हॉटेल्स्, ढाबे, मॉलस् इ. परिसरात करडी नजर ठेवण्यात येणार आहे. जिल्हयातील महामार्ग तसेच वर्दळीच्या ठिकाणांवर लावण्यात आलेल्या नाकाबंदी दरम्यान प्रत्येक वाहन चालकाची ब्रेथ अॅनालायझरव्दारे तपासणी करण्यात येणार असुन, रात्री उशिरापर्यंत पथकांकडुन ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह ची कारवाई सुरू राहणार आहे. तसेच राज्य व राष्ट्रीय महामार्गांवर परराज्यातुन होणारी अवैधरित्या मद्याची विक्री व वाहतुकीस प्रतिबंध होणेसाठी चेकपोस्टवर सतर्क नाकाबंदी लावुन कारवाई करण्यात येणार आहे. तसेच मद्य प्राशन करून बेधुंद अवस्थेत मस्ती करणारे इसमांवरही दारूबंदी कायदयान्वये कारवाई करण्यात येणार आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी मा.पोलीस अधीक्षक सो यांचे मार्गदर्शनाखाली ४० पोलीस ठाणेनिहाय मॉकड्रिल सुरु करण्यात आली असुन दंगल नियंत्रण पथक, शीघ्र कुती दल (**QRT**) तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे प्रात्यक्षिके सुरु आहे. याचबरोबर गोळीबार मैदानावर गोळीबाराचा सरावही सुरु आहे. सरावा दरम्यान मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो, अपर पोलीस अधीक्षक श्री. नीलोत्पल सो. यांचेसह जिल्हयातील ०८ उपविभागनिहाय उपविभागीय पोलीस अधिकारी, ०४ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखा, विशेष शाखा, वाहतुक शाखेसह, पोलीस मुख्यालयातील पोलीस कर्मचारी उपस्थित होते. ३१ डिसेंबरला जिल्हयातील पोलीस यंत्रणा सज्ज असुन गैरवर्तन करणा-यांवर कारवाई केली जाईल असे आवाहन करण्यात आले आहे.